# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

**दिनांक २४/०३/२०२२ (गुरूवार)**

**(सकाळ)**

---

### घरफोडी

**पो.स्टे. बेला** :– अंतर्गत १२ कि. मी. अंतरावरील पिपळा येथे दिनांक २३/३/२२ चे ०५.०० वा. चे सुमारास फिर्यादी नामे– योगेशवर तानबाजि तेलरांधे रा. पिपळा वार्ड क्र. ०३ ता. उमरेड जि. नागपुर हे आपले परिवारासह घरातील सर्व दरवाजे आतुन बंद करून झोपले. त्यानंतर दि. २३/०३/२०२२ रोजी सकाळी ०३.०० वा. त्यांना शेतीला पाणी देणे असल्याने ते मुला सोबत शेतात जावुन परत ०४.०० वा. घरी आले व बाहेर चा हॉल मध्ये समोरचा दरवाजा बंद न करता मुलासह झोपले व सकाळी ०५.०० वा. त्यांना जाग आल्याने त्यांनी पत्नीला उठवले असता पत्नी हीने मागच्या बेडरूम मध्ये गेली असता तिला स्टोर रूमचा दरवाजा व आलमारीचा दरवाजा उघडा दिसला व बेडरूम मध्ये सामान अस्त व्यस्त पडलेले व अलमारी मधील सोन्याचे दागिने कि. १,११,०००/–रू., नगदी १६,०००/–रू. जुना मोबाईल किमती १,०००/–रू. असा एकुण कि. १,२८,०००/–रू. तसेच युनियन बॅकची ०३ पासबुक युनियन बॅकचे एफडी, बंद एटीएम ०२, पॅन कार्ड ०४ कास्ट सर्टीफिकेट, शेतीचे ओरिजिनल कागदपत्रे सात बारा, नकाशे व इतर कागदपत्रे चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. बेला येथे आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सपोनी श्री पंकज वाघोडे पोस्टे बेला मोन ७३०४२७०७२४ हे करीत आहे.

### शारीरिक व मानसिक छळ करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

**पो. स्टे. मौदा** :– फिर्यादी नामे– सौ.मोनाली प्रीतम उघडे वय २६ वर्ष रा. स्नेहनगर मौदा ता. मौदा जि. नागपुर व आरोपी पति नामे – प्रीतम मुरलीधर उघडे रा. स्नेहनगर मौदा ता. मौदा हे दोघेही पतीपत्नी आहेत. अंतर्गत ०१ कि.मी. अंतरावरील स्नेहनगर मौदा येथे दिनांक २३/०२/२०२० चे ०९.३० वा. ते दिनांक २२/०२/२०२२ चे २०.३० वा. पर्यंत आरोपी नामे– १)मुरलीधर माणीकराव उघडे रा. स्नेहनगर मौदा, २) सौ. साधना मुरलीधर उघडे रा. स्नेहनगर मौदा, ३) स्वाती विजयराव खेरगडे रा. कन्हान, ४) विजयराव खेरगडे रा. कन्हान, ५) सौ.मिताली अनिस बेले रा.चिकना ता. मौदा, ६) अनिस वामणराव बेले रा.चिकना ता. मौदा, ७) प्रीतम मुरलीधर उघडे रा. स्नेहनगर मौदा ता. मौदा यांनी संगनमत करून फिर्यादीला मुलगी झाल्याचे कारणावरून सासरी राहायचे असेल तर वारंवार माहेरून पैश्याची मागणी केली. आरोपीतांनी मागणी पूर्ण न झाल्यानंतर फिर्यादीला शारीरिक व मानसिक त्रास देवुन तिचा छळ केला.

सदर प्रकरणी फिर्यादीचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपीतांविरुध्द कलम ४९८ (अ), ३४ भादंवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला असून आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास सपोनि श्री चौधरी मो.क्र. ९८२३२१७२०५ हे करीत आहे.

## फसवणुक

**पो.स्टे. मौदा** :- अंतर्गत १२ कि. मी अंतरावरील दिघोरी काळे येथे दिनांक ०७/०२/२०२० ते दिनांक १२/०२/२०२२ चे १०.३० वा. ते १३.०० वा. दरम्यान मनोहर श्यामरावजी ढोबळे, वय २९ वर्ष, दिघोरी काळे यांना अज्ञात आरोपीने १,००,०००/- रू. चे लोन पास करण्याचे आमीश दाखवून ५२,१५४/-रू. ची मागणी केली. त्यावरून मनोहर ढोबळे यांनी आरोपीला गुगल पे द्वारे ऑनलॉइन पद्धतीने ५२,१५४/-रू. ट्रान्सफर करून लोन न देता फिर्यादीची फसवणूक केली.

सदर प्रकरणी सर तर्फे सपोनि सोनेकर यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ४२० भादंवि. ६६ (ड) माहिती तंत्रज्ञान कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस निरीक्षक श्री खराबे हे करीत आहे.

## अपघातात मृत्यु

**पो.स्टे. कोंढाळी** :- अंतर्गत ०८ कि.मी. अंतरावरील मौजा रिगंणाबोडी बस स्टॉप समोर येथे दिनांक २२/०३/२२ वे १६/३० वा. ते १६.४५ वा. सुमारास एमएच- ३२/ सी- ४०८४ क्रमांकाचा कारच्या आरोपीने चालकाने त्याच्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन एमएच- ४०/बीव्ही - २२९१ क्रमांकाच्या मोटरसायकला मागुन धडक मारून काही अंतरावर मोटरसायकला घासत नेल्याने मोटरसायकलवर बसलेला राजकुमार नामदेव दिघोटे हा गंभीर जखमी होउन मोटरसायकलच्या मागे बसलेला लक्ष्मण किसनराव सातरगाडगे वय ६५ वर्ष रा अडेगाव याचे उजव्या पायाच्या पोटरी जवळ फॅक्चर होउन कपाडाला व डोक्याला जबर मार लागला. आरोपी घटनास्थळ वरून वाहन सोडुन पळुन गेला व दोन्ही जखमी यांना उपचाराकरीता स्टार हॉस्पीटल ८ मैल नागपुर येथे भर्ती केले असता लक्ष्मण किसनराव सातरगाडगे वय ६५ वर्ष रा अडेगाव हा उपचार दरम्याण मरण पावला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे- वसुदेवराव महादेवराव राऊत वय ५८ वर्ष रा गिदमगड ता हिगंणा जि नागपुर यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कोंढाळी येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३३७, ३३८, ३०४ (अ) भादवी १३४/१७७, १८४ मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक श्री राम ढगे ९५१८९७९४९९ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**